महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १६८ वा | दिनांक : ०६/०४/२०२५ | वार : रविवार

# मीच दोषी तरी माझीच समिती आणि माझीच चौकशी?




**मुंबई :** मंगेशकर रुग्णालयातील संतापजनक प्रकरणानंतर आता रुग्णालयाने चौकशी करण्यासाठी समिती नेमली आहे. मात्र हॉस्पिटलच्या वतीने नेमण्यात आलेल्या या समितीवर मंत्री हसन मुश्रीफ यांनी टीका केली आहे. मी समिती नेमणार, मीच चौकशी करणार, तर मी दोषी कसा होणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. त्या महिलेला दाखल करून उपचार केले असते तर काय झालं असतं? असा प्रश्न त्यांनी रुग्णालयाला विचारला आहे. त्यांनी माणुसकीच्या भूमिकेतून याकडे बघणे आवश्यक होते, असे देखील ते म्हणाले.

तनिषा भिसे या महिलेला प्रसुतीच्या वेदना सुरू झाल्यावर तातडीने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारासाठी रुग्णालय प्रशासनाने दहा लाख रुपयांची मागणी केली. तेव्हा जवळ सध्या दोन लाख रुपये आहेत, तेवढे घेऊन उपचार सुरू करण्याची विनंती कुटुंबीयांनी केली. मात्र तरी देखील महिलेला प्रसूतीसाठी दाखल करून घेतले नाही. त्यानंतर गर्भवती महिलेला दुसऱ्या रुग्णालयात नेण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. गर्भवती महिलेला दुसऱ्या रुग्णालयात नेत असताना महिलेला त्रास झाला आणि दोन जुळ्या बाळांना जन्म देऊन महिलेने श्वास सोडला. त्यानंतर आता या प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे. मात्र, रुग्णालयाच्या कडून तयार करण्यात आलेल्या समितीवर मंत्री हसन मुश्रीफ यांनी टीका केली आहे.

मुंबईमधील कोणत्याही दवाखान्यामध्ये आयुष्यमान भारत जीवनदायी योजना नाही, अशी धक्कादायक माहिती सुद्धा मंत्री मुश्रीफ यांनी दिली. या संदर्भात बोलताना ते म्हणाले की, दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनाला सवलत देण्यात आलेली आहे. हे रुग्णालय धर्मादाय आयुक्त खाली रजिस्टर असल्याने त्यांना कोणताही टॅक्स लागत नाही. मात्र या रुग्णालयाच्या माध्यमातून गोरगरिबांची सेवा होणे अपेक्षित असते. महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना देखील ते लागू करत नाहीत. असे असेल तर गरीब रुग्णांना लाभ कसा मिळेल. त्यामुळे त्यांनी महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना लागू करावी, तसे झाले तर अशा घटना घडणार नाहीत, अशी आपली विनंती असल्याचे देखील मंत्री मुश्रीफ म्हणाले.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात महात्मा फुले आरोग्य विमा योजनेचा लाभच मिळत नसल्याची माहिती देखील समोर आली आहे. मंगेशकर हॉस्पिटलने एका रुग्णाला पेपर वर महात्मा फुले योजनेचा लाभ मिळत नाही, असे लिहून दिले आहे. यावर परशुराम हिंदू सेवा संघाने आक्षेप घेतला आहे. असे असले तर सरकारने सर्वसामान्य आणि गोरगरिबांसाठी घोषित केलेले योजनेचे काय होणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. या योजनेचा उद्देश राज्यातील गरीब आणि गरजू लोकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे आहे. त्यामुळे या रुग्णांना आर्थिक अडचणींमुळे उपचारापासून वंचित राहावे लागणार नाही. मात्र आता ही योजनाच रुग्णालय राबवली जात नसल्याची धक्कादायक आरोप केला जात आहे.

# 'द डायरी ऑफ अ होम मिनिस्टर'वर बंदी येणार? सुप्रिया सुळेंचा सरकारला इशारा




**मुंबई :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अनिल देशमुख यांनी आपल्या 'द डायरी ऑफ अ होम मिनिस्टर' या पुस्तकाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अनेक गंभीर आरोप केलेत. विशेषतः आदित्य ठाकरे, पार्थ पवार, दिशा सालियन प्रकरण तथा आपल्या कुटुंबीयांना झालेला त्रास यावर त्यांनी या पुस्तकाद्वारे प्रकाश टाकला आहे. पण आता फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकार या पत्रावर बंदी घालण्याच्या विचारात असल्याची माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शनिवारी या प्रकरणी सरकारवर अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी करण्याचा आरोप करत निर्वाणीचा इशारा दिला आहे.

सुप्रिया सुळे शनिवारी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाल्या, माजी गृहमंत्री अनिल देशमुख साहेब यांच्या 'द डायरी ऑफ अ होम मिनिस्टर' या पुस्तकावर बंदी घालण्याचा सरकार विचार करीत असल्याचे समजते. या पुस्तकात त्यांनी अनेक खळबळजनक खुलासे केले आहेत. या पुस्तकावर बंदी घातल्यास अभिव्यक्तीचा आवाज दडपला जाईल हे स्पष्ट आहे. पण या सरकारने लक्षात ठेवायला पाहिजे की त्यांनी कितीही प्रयत्न केले तरीही सत्याचा आवाज कधीही कुणाला कायमस्वरूपी दडपता येत नाही. अंतीम विजय सत्याचाच होतो.

अनिल देशमुख यांनी आपल्या 'द डायरी ऑफ अ होम मिनिस्टर' या पुस्तकात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील तत्कालीन महाविकास आघाडीचे सरकार पाडण्याचे कट कारस्थान कसे शिजले? याची सविस्तर माहिती दिली आहे. विशेषतः पोलिस दलातील अधिकाऱ्यांना प्यादे बनवून कशी चाल खेळली गेली? यावरही देशमुखांनी प्रकाश टाकला आहे.

या पुस्तकात नमूद माहितीनुसार, देवेंद्र फडणवीस यांनी 3 वर्षांपूर्वी माझ्याकडे त्यांच्या जवळचा एक माणूस पाठवला. त्या माणसाने फडणवीसांशी माझे अनेकदा बोलणे करून दिले. त्यांनी माझ्याकडे एक लिफाफाही पाठवला. त्यातील 4 मुद्द्यांचे प्रतिज्ञापत्र तयार करून द्या असे त्यांनी मला सांगितले. मी ते प्रतिज्ञापत्र दिले असते तर उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्यासह अजित पवार अडचणीत आले असते. मी त्यांचा प्रस्ताव फेटाळला. त्यामुळे माझ्यावर ईडी व सीबीआयच्या माध्यमातून कारवाई करण्यात आली.

अनिल देशमुख यांच्या पुस्तकात अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांचे काय होणार होते? भाजप त्यांना कसे अडकवणार होती? स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे नातू तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे सुपुत्र आदित्य ठाकरे यांच्याविरोधात कोणता कपटी डाव रचला गेला? याविषयीही अनेक धक्कादायक दावे असल्याची माहिती आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल - पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ एप्रिल २०२५


## कडू शेवगा या ग्रामीण कथा संग्रहाससाहित्य रत्न. लोकशाहिर आण्णा भाऊ साठे राष्ट्रीय वाङ्मय पुरस्कार जाहिर



**छत्रपती संभाजीनगर** : येथील जेष्ठ साहित्यिक श्री तात्याराव पुंजाबा पवार,यांच्या कडू शेवगा या ग्रामीण कथासंग्रहात मातंग साहित्य परिषद पुणे यांचे तर्फे दिला जाणारा साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. येत्या तेरा एप्रील रोजी संस्थेच्या पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात म.ज्योतिबा फुले व परमपूज्य भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमीत्त पद्मश्री गिरीशजी प्रभुणे, यांच्या अध्यक्षतेखाली आणि राज्यसभेचे माजी सदस्य विनय जी सहस्त्रबुद्धे यांचे शुभ हस्ते व मातंग सा.परिषदेचे अध्यक्ष डॉ.धनंजय भिसे व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये प्रदान करण्यात येणार आहे.

## रेल प्राथमिक शाळेमध्ये सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ



**छत्रपती संभाजीनगर** : जि प शाळा रेल येथे सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कन्नड तालुक्यातील रेल प्राथमिक शाळेमध्ये सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ देण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रवीण शिंदे यांनी विद्यार्थ्यांना निरोप समारंभाच्या प्रसंगी बोलताना विद्यार्थ्यांनी सातत्याने अभ्यास केला पाहिजे हे स्पर्धेचे युग आहे या मध्ये आपण टिकलं पाहिजे म्हणून आपण नियमित अभ्यास करावा असं प्रवीण शिंदे यांनी बोलले यावेळी सातवीच्या विद्यार्थ्यांना स्नेहभोजनाचा कार्यक्रम घेण्यात आला सातवीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांना भेटवस्तू दिल्या त्यानंतरसातवीच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा सुद्धा शाळेला तीन घड्याळी भेट दिल्या यावेळी जिल्हास्तरावर व्हॉलीबॉल संघ निवड झालेल्या खेळाडूंचा सुद्धा सत्कार करण्यात आला यावेळी रेल तांडा शाळेचे मुख्याध्यापक संदीप गुंजाळ व शाळेच्या सहशिक्षिका वैशाली बोरसे व विक्रम गडाळे छाया बारगळ शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य आदी उपस्थित होते आणि विद्यार्थी उपस्थित होते

## शेतकऱ्यांचे अंढेरा पोलीस स्टेशनवर ठिय्या आंदोलन




**चिखली (महेश मुंढे)** : महायुती सरकारने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना दिलेल्या सरसकट कर्जमाफीच्या आश्वासनाची पूर्तता न केल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्ह्यातील अंढेरा पोलीस ठाण्यावर शेकडो शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलन करत सरकारविरोधात फसवणूक (कलम ४२०) आणि आत्महत्येस प्रवृत्त करणे (कलम ३०६) या गुन्ह्यांखाली तक्रार दाखल करण्याची मागणी केली आहे.शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली भरोसा, देऊळगाव घुबे, रामनगर परिसरातील शेकडो शेतकरी पोलीस स्टेशनवर एकत्र आले. त्यांनी निवडणूकपूर्व आश्वासनाची आठवण करून देत सांगितले की, त्याच विश्वासावर त्यांनी महायुतीला मतदान केले. मात्र, सत्ता स्थापनेनंतर सहा महिने उलटून गेले तरीही सरकारकडून कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आलेला नाही.दरम्यान, मार्च महिन्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना 31 मार्च 2025 पर्यंत कर्ज फेडण्याची तंबी दिली होती. या इशाऱ्यामुळे अनेक शेतकरी मानसिक तणावात आले असून काहींनी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलल्याच्या घटना समोर आल्या आहेत.तक्रार देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यांना उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम यांनी आपल्याला “सरकारविरोधात गुन्हा दाखल करण्याचा अधिकार नाही” असे सांगून ही तक्रार एसपी कार्यालयाकडे पाठवुन देण्याचे आश्वासन दिले. या अनपेक्षित गर्दीमुळे पोलीस प्रशासनाचीही तारांबळ उडाली होती. अतिरिक्त पोलिस फोर्स आणि व्हॅन अंढेरा पोलीस स्टेशनवर दाखल करण्यात आल्या.या आंदोलनात एकनाथ पाटील, देविदास कंकर, समाधान कनकर, प्रकाश अंभोरे, अच्युतराव पाटील, विलास जमले, प्रकाश घुबे, धोंडू पाटील, तेजराव मुंडे, ज्ञानेश्वर पाटील, गणेश तुपे, विठ्ठल शेटे, नंदकिशोर भगत, आत्माराम गाडी, समाधान घुगे, एकनाथ दगडू पाटील, परमेश्वर गवते, विलास राऊत, विठ्ठल तुपे, सुरेश पवार, शेषराव जाधव, भगतसिंग पवार, जनार्दनातपट, सदाशिव श्रीकृष्ण डोईफोडे, नारायण पैठणी चव्हाण, लिंबाजी पाटील, जगन्नाथ विकास सोळंकी यांसह शेकडो शेतकऱ्यांनी सह्या केल्या आहेत.शेतकऱ्यांची भूमिका ठाम असून त्यांनी स्पष्ट केले आहे की, "जोपर्यंत सरकारविरोधात गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत आमचे ठिय्या आंदोलन थांबणार नाही."

## केसांत माळूनिया

केसांत माळूनीया गजरा.
फिरवीते सर्वांवर नजरा.
लावण्यवती अहो अप्सरा.
गिरकी घेतसे गरा गरा.

केसांत माळूनिया गजरा.
ठुमकत चाली भराभरा.
चैतन्य आणते चराचरा.
यौवनाचा दाखवी नखरा.

*केसांत माळूनिया गजरा.*
आनंद प्रीतीचा देई खरा.
स्वभाव अजब हा गहरा.
मूर्च्छा येतसे तरुण पोरां.

केसांत माळूनिया गजरा.
पदर सरकवी सरासरा.
जीव होतो घाबरा घाबरा.
गगनाला मिठी मारे धरा.

**कवी. संजय मुकूंदराव निकम.**
**मालेगाव जि.नाशिक. पिनकोड ४२३२०३.**
**मो.न.८६५७४८८४२६**




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ एप्रिल २०२५


# तिफण कथाविशेषांक - समकालीन वास्तवाचे प्रतिबिंब




डॉ.शिवाजी हुसे देशगव्हाण कर यांनी संपादित केलेला कथाविशेषांक प्रसिद्ध केला.यात अतिशय आशय संपन्न व समकालीन मानवी वास्तवाचे सामाजिक भान देणाऱ्या अस्सल मानवी मूल्यांचा ऱ्हास कसा होतोय.म्हणजे.साहित्य विश्वाची 'धग' उलगडून या व्यवस्थेचा 'घंटानाद' करतं 'मुखवटा' दाखवून मायेनं 'लळा' दाखवत 'किसाना'चा 'शोध' घेत 'उचकटलेल कोपाट' पाहून पुन्हा 'एक आत्महत्या होतांना' 'गोष्ट एका 'वळू'ची' 'सावट' 'दामिनी' होऊन.टांगा 'पल्टी' घोडं फरारं अशा ह्या बारा घरच्या बारा जणी कथा साजणी तिफण अंकात आहे.वाड्मयीन नियतकालिकांच्या पदरमोडीत अतिशय वाड्मयीन निकष पूर्णत्वाने देऊन मोठ्या दिमाखाने आजतागायत कायम विविध विशेषांक प्रसिद्ध केले आहेत कथा स्पर्धेतल्या उत्कृष्ट कथेचा कथांक.कवी लक्ष्मण खेडकर गावखेड्यातील माय मातीशी कायम घट्ट नाळवंत, कष्टवंत अध्यापक, सृजनदृष्टी असलेला सन्मित्र. 'वावरात सोडलेली बैलगाडी' शाळू ज्वारीच्या सुड्या,लिंबांची पानगळ व लिबेपालवी,उन्हाचा तलखा,अन् झळाया,..ग्रामीण भागातील वावराचे आजचे वास्तवदर्शी हे मुखपृष्ठ मनस्वी झाले आहे.'धग'ही अनंता सूर प्रथम क्रमांकाची कथा.कथानायक लक्ष्मण रिक्षा चालक,घरांना दार चावडी बिऱ्हाड.रामुकाका आश्रय देतात. रामुकाकाची बायको लक्ष्मी.भांडकुधळ.मुलगा शिक्षणाच्या नावाखाली बेकार व्यसनी होतो.रामुकाकाच्या विधवा बहीणाचा विवाह लक्ष्मण बरोबर होतो.पुढे लक्ष्मी अकाली मरते.मुलाचे लग्न होते.नवी नवरी लक्ष्मणच्या बायको बरोबर भांडण करते.पोलिस ठाण्यात तक्रार देते..हा कौटुंबिक कलहाची धगघेऊन पोलिस ठाण्यात माफी मागून लक्ष्मण घरी येतो.आजच्या घडीला गावगाड्यात नात्यागोत्यात मरणावर टपलेले रघतपारखेपणा या कथेतून अनंता सूर यांनी समर्थपणे मांडला आहे.घंटानाद प्रा.सुरेश आडके यांचीलव्ह जिहाद हा विषय पण अतिशय अप्रतिम अफलातून कथेची कलाटणी मन गहिवरून जाते.उच्च विभूषित संस्कृती ही पळून जाऊन मुस्लिम मुलांबरोबर कायद्यानेलग्न करते.पण त्या घरात संस्कारक्षम,सद्विचारांची मांदियाळी ते जसे नमाजीस्त तसे सूनेला ही तिचा स्वतंत्र देव्हारा.संस्कृतीचे आई बाबा जेंव्हा तीला भेटायला जातात तेव्हा कळते तिच्या गळयातील तुळशीची माळ,दिवा,त्यांचा ही सात्विक आहार.सगेसायरे म्हणून संस्कृतीच्या आई बाबांचा मान सन्मान. एका सुसंस्कृत मुस्लिम बांधव ही माणसचं माणसातली माणुसकी जपणारे.'मानवता हाच खरा धर्म' सांगणारी ही उत्तम आशय संपन्न असलेली कथा.महाभारताचा संदर्भ देत मानवी मनाचे शल्य कायम ठणक देऊन जाते.स्त्री ही अनंत युगाची माता म्हणत असतांना काही वासनांध लोकं स्त्री उपभोगाची नाही तर फक्त भोगा ची वस्तू आहे.संतोष जाधव यांची 'मुखवटा'या कथेतील मंगेश त्याची पत्नी लतिका यांच्या संसाराचीकथा.मंगेश हा पत्नीला केवळ भोग वस्तू म्हणून पाहतो.एक मुग्धा मुलगी होऊन ही तो थांबतनाही.दवाखान्यात तपासणीसाठी जाताना बाईकवर मागे बसलेली ललितका मृत्यू पावते.काही दिवसांनी दुसऱ्या लग्नाचा विषय.पण ज्या तिच्या मोठ्या बहिणीला यानेच नाकारले होते.ती मात्र याला नकार देते.आणि त्याचा वासनांधतेचा मुखवटा फाडून टाकते.ह्या अशा वैवाहिक सौख्य किळसवाणे करणारे मानवी जनावरे या व्यवस्थेतआहे.कथेचा आत्मा हा मानवी मूल्ये जोपासना असल्याने अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक उद्बोधन करणारी ही कथा आहे.सन्मित्र विठ्ठल जाधव यांची 'लळा' ही ग्रामीण कथा.महादू या कथेचा बाल नायक.पोरका.भिल्लजमातीचा.डमाळे मास्तरांनी लळा लावला. शाळा बाह्य विद्यार्थी, मळक्या कपड्याचा, खेकडे,माशा पकडणारा.या विद्यार्थ्यांला शिक्षणाच्या प्रवाहात आणून.शाळेचा लळा लावला.डमळे मास्तरांची बदली झाली.महादूची शाळा सुटली.एक बालमनाचे भावविश्व उलगडून दाखवणारी कथा.'किसना'ही प्राजक्ता शित्रे यांची अस्वस्थ अस्सल ग्रामीण कथा.आवकळी पावसानं वावरातलं सोंगून ठेवलेलं पिकं.साऱ्या रानात पाण्यातच तळं अन् उद्ध्वस्त खळ करून टाकवं.कर्जाची चारगाठ गळ्याला आवळावी.बाईचं अप्रिशन तसचं राहतं.किसना ऊसतोडणीला जातो.पायाला कोयता लागतो.बाहेती डॉ.ला दाखवतो.एकूण शेतकरी किसनाची जगण्याची कुतर ओढ या कथेत दमदारपणे मांडली आहे.अलकनंदा घुगे-आंधळे यांची दामिनी ही कथा.एका नारायणंचे पारायण दाखवणारी कथा.अंबड शहरांमध्ये शिक्षणासाठी आलेली एक गाव खेड्यातील मुलगी.आपल्या बापाच्या वयाचा नारायण.दामिनी ला ब्लेकमेल करू पाहणारा.दामिनी पथकांच्या साह्याने बदडून काढले.मुलीच्या असह्यतेचा गैरफायदा घेणारे जवळचे गाव गोतावळ्याचे ही माणसं दगा देणारी निघाली.हा समकालीन वास्तवाचा हिनकस तोंडावळा या कथेतून दिसून येतो.ज्योती सोनवणे -पवार यांची 'पल्टी'कथा निखुळ ग्रामीण मराठमोळ्या शैलीचाअस्सल बाज असलेली.गावखेड्यातलं बायकांचं राजकारण.सोजर चा नवरा किसन्या.चंपाला दिवसं गेले.गावात आवाई. सोजरनं ज्यो डांगीनवाडा केला त्यात तिच्याच नवरा किसन्या हाये.टांगा पल्टी किसना फरार अतिशय दमदार कथानक असलली कथा."प्रेमाचा शोध घेण्यासाठी बाहेर जाऊ नका तो आपल्याचं नात्यांच्या माणसात आहे".'शोध'मंगल कातकर यांची 'लव्ह इन रिलेशनशिप'यातून निर्लेप नितळ पवित्र नात्याची मनमिळाऊ माणूस दुरावतात.देश विदेश,अमाप पैसा, श्रीमंतीचा कैफ चढला की,नात्यांचाकचरा होतो.आजच्या वास्तवात प्रचंड शहराळलेल्या लोकांचा पिसाळलेला डॉग होऊन जातो. लोक नशापान करतात.मी पैसा कमवतो.तू स्त्री म्हणून नुस्ती बटिक आहेस.ही अस्वस्थ वेदना मुखर करणारी कथा.कोरोना काळाचं एका सर्वसामान्य कुटुंबाची वेदना दायक कथा म्हणजे 'सावट'- डॉ. राजेंद्र वाटाणे.आई,सिंधू,अपंग मुलगा पंकज, हे सारं मृत्यूचं सावट,बाप शामराव.रेमंडेशीन, इंजेक्शन व तत्कालीन कोरोना काळाचं दु:ख उजागर करण्यात ही कथा यशस्वी झाली आहे.गावखेड्यातील स्त्री जीवनाचं दु:ख आणखीही संपत नाही.एकटी असह्य मादीदिसली की, गावं लांडगे लचके तोडायला टपून बसलेले आहेत.विस्कटलेलं कोपाट -अनुराधा उपाध्ये यांनी या कथेतून ही विधवा स्त्रींची वेदना मांडली आहे.शेतकऱ्यांची आत्महत्या अजूनही थांबलेली नाही.पंडित वराडे यांच्या कथेचा नायक कायमचं दु:खाच्या सावटात आहे.कारणशेतकरी त्यांचे असंख्य प्रश्न आणि बेभरवशाची बारमाही खेती.अपमानीत जगणं नको झालं की, हा आत्मघातकी मार्ग आता नकोसा झाला आहे.बैलबारदाना व जितराब ही कुणबाऊ जगण्याची उर्मी आहे.आपल्या दावणीला कायम गाई गुरू असावी तेंव्हा धन धान्यांची रेलचेल असायची.आता सारंच उखळ पांढरं झालं आहे.मेखा,खुटे सारेच उपटले आहेत. दावण गेली,अन् मेवन गोष्ट आली.एक नादखुळा गुरुजी मधुकर कदम.'गोष्ट एका वळूची'राजेंद्र भाग्यवंत. गुरूजी एक वासरू विकत घेऊन त्याचं मनसोक्त संगोपन करून त्याला स्पर्धेत उत्कृष्ट सात हजाराचं पारितोषिक मिळविणारे मधूकर कदम गुरूजी.हेअस्वासक चित्र दाखवणारी उत्तम कथा.तत्कालीन गाव शिवाराचे वर्णन छान.ग्रामीण बोलीशैली:-तिफण कथाविशेषकांत बोली शैलीचा आविष्कार हा पाह्यला मिळतो.दामिनी,पल्टी, व घंटानाद,लळा,या कथा बोली शैलीच्या अंगाने उत्तम आशय देणाऱ्या अस्सल कथा आहेत.जसे,कव्हा,मव्हा,कव्हून, मराठवाडी बोली शैलीच्या या कथा आहेत.धग,या कथेतील वैदर्भीय, खानदेशी,तसेच कोकणी लेहज्याची ही कथा आहे.बोलीशैलीने कथेचा आत्माआविष्कृत होतो.वाचकाभिमुख होण्यासाठी कथा ही समकालीन वास्तवाचे चित्रण करणारी असावी.तसे या कथा विशेषांकाचे दिले आहे.आजच्या मानवी कोलाहलचे व नात्या गोत्याचे तुटत चाललेल्या गाठी.रघतपारखेपणाचा कोरडा टाहो या कथांने दिला आहे.अतिशय अभिनंदनीय व मुखपृष्ठांनेआशयवलांकित असा अंक आहे.वाचकांनी संग्रही ठेवावा.संपादक शिवाजी हुसे सरांचे मन:पूर्वक अभिनंदन व शुभेच्छा.


**डॉ. प्रभाकर शेळके, जालना.**
**मो.९९७५१३७३३७**



**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ एप्रिल २०२५


## मनसेच्या आंदोलनाला आम्ही मराठीचे आंदोलन म्हणणार नाही - संजय राऊतांचा राज ठाकरेंवर निशाणा



**नाशिक** : गेल्या काही दिवसांपासून मराठी भाषेसंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने राज्यात सुरु असलेल्या आंदोलनावर संजय राऊत यांनी जोरदार टीका केली. मराठीसाठी आम्हीही आंदोलने केली आहेत. पण मनसेच्या आंदोलनाला आम्ही मराठीचे आंदोलन म्हणणार नाही, असे संजय राऊत म्हणालेत. आमच्या त्यांच्या राजकारणाला शुभेच्छा, असा टोलाही त्यांनी लगावला. मनसेचे आंदोलन हे देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेरणेने चाललेले आहे, असा दावाही राऊत यांनी केला.

संजय राऊत म्हणाले, आंदोलनाची राजकारणाची जी काही परंपरा आहे, त्यानुसार त्यांनी काम केले. आमच्या त्यांच्या राजकारणाला शुभेच्छा आहेत, असा टोला ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज ठाकरे यांना लगावला. त्यांच राजकारण आहे, त्यांचा पक्ष आहे, त्यांचे कार्यकर्ते आहेत. पण ज्या प्रकारचे आंदोलन मराठीविषयी मी पाहत होतो, त्याला मी मराठीचे आंदोलन म्हणणार नाही.

बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सुद्धा मराठी भाषेसाठी आंदोलने केलेली आहेत. मराठीसाठी आम्हीही लोकांच्या कानफडात मारलेल्या आहेत. बँकांमध्ये, सरकारी आस्थापणांमध्ये, एअर इंडियामध्ये राष्ट्रीय स्तरावर भरती होते, हे लक्षात घेतले पाहिजे. त्या भरती परीक्षेमध्ये मराठी मुलांना यश मिळण्यासाठी आम्ही क्लासेस चालू केले. अनेक तज्ज्ञ आणून शिवसेना भवनमध्ये क्लासेस चालवून मुलांची मानसिक तयारी केली. एवढी तयारी करून सुद्धा ती मुले नोकरीत आली नाहीत, काही गडबड दिसली, तर आम्ही आंदोलने केली. सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे, हे मान्य केले पाहिजे. त्या स्पर्धेमध्ये आपल्या मुलांनी पुढे न्यायचे असेल, तर त्यांची त्या पद्धतीने तयारी केली पाहिजे, असे संजय राऊत म्हणाले.

मारामाऱ्या आम्हीही खूप केल्या. यापुढेही करत राहू. पण मराठीच्या आंदोलनाला अशा प्रकारची एक दिशा द्यावी लागते, ती आम्ही दिली. म्हणून आम्ही हजारो मुले बँकेमध्ये नोकरीत लावली. मराठी भाषेचा आग्रह धरून आम्ही बँकांमध्ये, सरकारी आस्थापनांमध्ये मराठी भाषा करायला लावली. साहित्यिक, सांस्कृतिक, मराठी कार्यक्रम आजही बँकांमध्ये होतात, ते आमच्यामुळे होतात. आम्ही त्यासाठी कुणालाही कानफटात मारली नाही, असे संजय राऊत म्हणाले.

दुर्बलांवर हात टाकून चालत नाही. मराठी भरती करत नाही, म्हणून आम्ही एअर इंडियाच्या वॉचमनला मारले नाही. आम्ही एअर इंडियाचा सीएमडी कॅप्टन नंदाच्या कानफटात मारली होती. जो प्रमुख आहे, ज्याच्या हातात निर्णय घेण्याची क्षमता आहे, त्याच्या कानफटात मारली पाहिजे. वॉचमन, शिपाई, चहा देणारा अशा लोकांना मारून आंदोलन होत नाही, असेही संजय राऊत म्हणाले. मनसेचे आंदोलन हे देवेंद्र फडणवीस यांच्या प्रेरणेने चाललेले आहे. देवेंद्र फडणवीसांनी मराठी माणसासाठी कुठले आंदोलन केले? असा सवालही संजय राऊत यांनी उपस्थित केला. फडणवीसांना या राज्यात गोंधळच घालायचा आहे.

संजय राऊत म्हणाले की, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या संदर्भात काही लोकांनी आंदोलन केले. त्यावर हे लोक शोबाजी करत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणत आहेत. इतके भंपक राज्य या महाराष्ट्रात कधी आले नव्हते. आरएसएसचे लोक त्या रुग्णालयात काम करतात म्हणून मुख्यमंत्री असे म्हणतात. रुग्णालयाची सगळी बॉडी भाजप समर्थक असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला. मुख्यमंत्री पदासाठी एक दर्जा लागतो, तो देवेंद्र फडणवीस यांचा नाही, अशी टीका संजय राऊत यांनी केली.

संजय राऊत यांनी ट्विटरवर एकनाथ शिंदे यांचे एक खासदार असदुद्दीन ओवैसी यांच्याबरोबर चर्चा करत असताना एक व्हिडिओ ट्विट केला. याबाबत त्यांना विचारले असता राऊत यांनी एसंशि पक्षाचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांच्याबरोबर हिंदुत्वावर चर्चा करताना आम्हाला आढळल्याचे म्हणाले. हेच दुसऱ्या कोणाचा खासदार असता, तर हिंदुत्व वगैरे फार धोक्यात आले असते. हिंदुत्व कसे धोक्यात आले, याबाबत एसंशि, देवेंद्र फडणवीस बोलले असते, अशी टीका राऊत यांनी केली. माझ्या माहितीप्रमाणे एसंशि पक्षाच्या खासदाराने ओवैसी यांना ठाण्यात यायचे आमंत्रण दिले. एसंशि पक्षाला असदुद्दीन ओवैसी यांचा टेंभी नाक्यावर सत्कार करायचा आहे, असा टोलाही राऊत यांनी शिंदे गटाला लगावला आहे.






## कुणाल कामरा पुन्हा मुंबई पोलिसांसमोर हजर झाला नाही



**मुंबई** : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबन गाण्याच्या प्रकरणात विनोदी कलाकार कुणाल कामरा शनिवारीही मुंबई पोलिसांसमोर हजर झाला नाही. पोलिसांनी पाठवलेल्या समन्सचे पालन न करण्याची कामराची ही तिसरी वेळ आहे. यापूर्वी पोलिसांनी कामरा याला दोन समन्स पाठवले होते.

दुसरीकडे, कुणाल कामराला मोठा धक्का बसला आहे. शनिवारी बुकमायशोने त्याच्याशी संबंधित सर्व सामग्री काढून टाकली. एवढेच नाही तर त्यांचे नाव त्यांच्या वेबसाइटवरून कलाकारांच्या यादीतूनही काढून टाकण्यात आले आहे.

खरंतर, शिवसेना नेते राहुल कनाल यांनी ३ एप्रिल रोजी बुक माय शोला एक पत्र लिहिले होते, ज्यामध्ये त्यांनी कुणाल कामरा यांना त्यांच्या भविष्यातील शोसाठी तिकीट प्लॅटफॉर्म देऊ नये अशी विनंती केली होती.

कुणाल कामरा १ एप्रिल रोजी मद्रास उच्च न्यायालयात हजर झाला होता. त्याने असा दावा केला होता की पोलिस त्याला अटक करण्याचा प्रयत्न करत आहेत, म्हणून त्याला ट्रान्झिट अँन्टिसिपेटरी जामीन मंजूर करावा. या खटल्याची सुनावणी करताना न्यायमूर्ती सुंदर मोहन यांनी कामरा यांना संक्रमण अटकपूर्व जामीन मंजूर केला. यानंतर, त्याने X वर एक पोस्ट शेअर केली.

*आज कलाकारांकडे फक्त दोनच पर्याय आहेत: तुमचा आत्मा विकून डॉलरसाठी कठपुतळी बना, किंवा शांतपणे मरून जा.*

तथापि, यापूर्वी २८ मार्च रोजी उच्च न्यायालयाने कामरा याला ७ एप्रिलपर्यंत अटकपूर्व जामीन मंजूर केला होता.

## निरोपाचे भाषण करताना विद्यार्थिनीचा मृत्यू

**धाराशिव** : वर्गात निरोपाचे भाषण करताना एका २० वर्षीय विद्यार्थिनीचा व्यासपीठावरच मृत्यू झाल्याची मन सुन्न करणारी घटना धाराशिव जिल्ह्यातील एका महाविद्यालयात घडली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यावर सर्वच आबाल वृद्ध हळहळ व्यक्त करत आहेत. या घटनेमुळे जीवनव क्षणभंगूर असल्याची बाब पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, वर्षा खरात असे मयत विद्यार्थिनीचे नाव आहे. ती धाराशिवच्या परंडा शहरातील रा. गे. शिंदे महाविद्यालयाची विद्यार्थिनी होती. घटनेच्या दिवशी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम ठेवला होता. या कार्यक्रमाला सर्वच विद्यार्थी व पालक उपस्थित होते. या कार्यक्रमात निरोप दिले जाणारे विद्यार्थी व्यासपीठावर जावून आपापल्या भावना व्यक्त करत होते.

वर्षा खरात निरोप समारंभात भाषण करत होती. तिच्या भाषणात विद्यार्थी खळखळून हसत होते. 'प्रत्येकजण आपापल्या परीने जमेल तेवढा अभ्यास करत असतो', असे म्हणत तिने आणखी एक विनोद केला. त्यावर अख्खा वर्ग खळखळून हसला. त्यानंतर आपल्या शिक्षकवृदांचे कौतुक करता - करता ती अचानक खाली कोसळली. हे पाहून व्यासपीठावरील शिक्षक व समोर बसलेले विद्यार्थी तिच्या दिशेने धावले. तिला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण तत्पूर्वीच तिने आपली इहलोकीची यात्रा संपवली होती. वर्षाच्या मृत्यूचे खरे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. पण वाढते ऊन व दगदग यामुळे तिचा मृत्यू झाला असावा असा अंदाज व्यक्त केला जात आहे.